**नक्षलग्रस्त आदिवासी भागातील कायम विनाअनुदान तत्वावरील महिला महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्यासंदर्भात सर्वंकष अभ्यास करण्यासाठी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय तज्ञ समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-अनुदा-२०२६/ई-७३२११०/मशि-४**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.**
**दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२६.**

**प्रस्तावना :-**

नक्षलग्रस्त भागातील महिलांच्या शिक्षणाचे नोंदणी गुणोत्तर राज्याच्या सरासरीपेक्षा कमी असल्याचे आढळल्याने व सदर महाविद्यालयांना अनुदान दिल्यास या भागातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढेल, ही बाब विचारात घेऊन नक्षलग्रस्त आदिवासी भागातील कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या महिला महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्याबाबत सर्वंकष अभ्यास करण्यासाठी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय तज्ञ समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नक्षलग्रस्त आदिवासी भागातील कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या महिला महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्याबाबत सर्वंकष अभ्यास करण्यासाठी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे ५ सदस्यीय तज्ञ समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC), पुणे. | सदस्य |
| ३. | कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. | सदस्य |
| ४. | संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ५. | श्री. नितीन करमळकर, माजी कुलगरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. | सदस्य |
| ६. | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे | सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०२१६१६४५२८९००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.02.16 16:46:24 +05'30'

**( अशोक मांडे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास, गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
५. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई,
७. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC), पुणे,
८. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
९. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. श्री. नितीन करमळकर, माजी कुलगरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,
१२. विभागीय सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर,
१३. निवड नस्ती (मशि-४)